• वर्ष : ०३ • अंक : १७० • पुणे • सोमवार, दि. ०९ मार्च २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313



# भारताचा दबदबा कायम

## टीम इंडियानं तिसऱ्यांदा जिंकलं जग; अंतिम सामन्यात कीवींचा एकतर्फी पराभव करत लिहिला नवा इतिहास

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

### ९६ धावांनी धुव्वा; न्यूझीलंडचा एकतर्फी फडशा

# भारताचे तिसरे जगज्जेतेपद

**अहमदाबाद (दै. आरंभ पर्व)**

टीम इंडियानं आयसीसी पुरुष टी-20 विश्वचषक 2026 चं विजेतेपद पटकावलं आहे. रविवारी अहमदाबाद इथं खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारतानं 96 धावांनी दणदणीत विजय मिळवत तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवलं. सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं कीवींजसमोर 256 धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात न्यूझीलंड संघ 19 षटकांत अवघ्या 159 धावांत सर्वबाद झाला.

या विजयासह टी-20 विश्वचषकाच्या इतिहासात, तीन वेळा टी-20 विश्वचषक जिंकला आहे. याआधी भारतानं इंग्लंड आणि वेस्ट इंडिजसह दोन वेळा विश्वचषक जिंकला होता. मात्रन आता भारतानं न्यूझीलंडचा पराभव करत तिसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याचा कारनामा केला आहे. यामुळं सलग दोनदा टी-20 विश्वचषक जिंकणारा तो पहिला संघ बनला आहे. यजमान संघानं टी-20 विश्वचषक जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. दरम्यान, न्यूझीलंड पुन्हा एकदा विजेतेपद जिंकण्यात मागे पडला आहे.

प्रथम फलंदाजी करताना संजू सॅमसननं पुन्हा एकदा टीम इंडियासाठी शानदार फलंदाजी केली. यावेळी त्याला अभिषेक शर्मा आणि इशान किशन यांनी साथ दिली. संजू सॅमसननं फक्त 46 चेंडूत पाच चौकार आणि आठ षटकारांसह 89 धावा केल्या. अभिषेक शर्मानंही आपलं अर्धशतक गाठलं, त्यानं 21 चेंडूत सहा चौकार आणि तीन षटकारांसह 52 धावा केल्या. इशान किशननंही 25 चेंडूत चार चौकार आणि चार षटकारांसह 54 धावांची चांगली खेळी केली.

सामन्यात एकवेळ टीम इंडिया 270 धावांचा टप्पा ओलांडण्याच्या तयारीत दिसत होती, परंतु कर्णधार सूर्यकुमार यादव धाव न घेता बाद झाला. हार्दिक पांड्यानंही संथ खेळी केली, त्यानं 13 चेंडूत 18 धावा केल्या. तिलक वर्मा सहा चेंडूत 8 धावा करुन नाबाद राहिला. जेव्हा असं वाटत होतं की टीम इंडिया 250 पेक्षा जास्त धावा करु शकणार नाही, तेव्हा शिवम दुबेनं जबाबदारी घेतली. त्यानं शेवटच्या दोन षटकांमध्ये स्फोटक फलंदाजी केली. त्यानं फक्त आठ चेंडूत 26 धावा केल्या, ज्यात तीन चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. शेवटच्या षटकात भारतानं एकूण 24 धावा केल्या. कीवींकडून जेमी निशमनं सर्वाधिक 3 विकेट घेतल्या.

भारतानं दिलेल्या 256 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडची सुरुवात चांगली झाली नाही. फिन ॲलनच्या रुपात न्यूझीलंडचा पहिला बळी 31 धावांवर गेला. त्यानंतर, 32 धावांवर, रचिन रवींद्र 2 चेंडूत 1 धावा काढून बाद झाल्यानं कीवींना दुसरा धक्का बसला. मात्र, सलामीवीर टिम सायफर्टनं आपली हिंमत रोखली. त्यानं 26 चेंडूत 2 चौकार आणि 5 षटकारांसह 52 धावा केल्या. पण विजयासाठी ते पुरेसं नव्हतं. ग्लेन फिलिप्स 5 धावांवर आणि मार्क चॅपमन 3 धावांवर बाद झाले. न्यूझीलंडचा संघ 19 षटकांत 159 धावांवर बाद झाला. भारताकडून जसप्रीत बुमराहनं सर्वाधिक 4 विकेट घेतल्या.

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवरच्या या सामन्यात टीम इंडियाने 20 षटकांत पाच बाद 255 धावांची मजल मारली. सलामीच्या संजू सॅमसननं सलग तिसऱ्या सामन्यात झळकावलेलं वेगवान अर्धशतक भारताच्या या डावाचं प्रमुख वैशिष्ट्य ठरलं. त्याने 46 चेंडूंत पाच चौकार आणि आठ षटकारांसह 89 धावांची खेळी उभारली. संजू सॅमसननं अभिषेक शर्माच्या साथीनं पहिल्या विकेटसाठी 98 धावांची आणि ईशान किशनच्या साथीनं दुसऱ्या विकेटसाठी 105 धावांची भागीदारी रचली.

2026 च्या टी-20 विश्वचषकाचा अंतिम सामना 8 भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघात खेळवण्यात आला. हा सामना अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर झाला. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात टीम इंडियानं 96 धावांनी दणदणीत विजय मिळवत तिसऱ्यांदा वर्ल्ड कप जिंकण्याचा पराक्रम केला आहे. आतापर्यंत काही संघांनी दोन वेळा टी-20 विश्वचषक जिंकला आहे, परंतु भारतीय संघ असा पहिला संघ बनला आहे, ज्यांनी तिसऱ्यांदा विश्वविजय साकारला आहे. आतापर्यंत झालेल्या विश्वचषकांमध्ये कोणत्या संघानं विजय मिळवला ते जाणून घ्या. 2007 मध्ये, जेव्हा पहिल्यांदा टी-20 विश्वचषक खेळवण्यात आला, तेव्हा टीम इंडियानं एमएस धोनीच्या नेतृत्वाखाली स्पर्धेत भाग घेतला. अंतिम सामन्यात भारतीय संघाचा सामना पाकिस्तानशी झाला, जो टीम इंडियानं जिंकला आणि त्यांची पहिली ट्रॉफी जिंकली. त्यानंतर, टीम इंडियाला दुसऱ्यांदा ट्रॉफी जिंकण्यासाठी 17 वर्षे वाट पाहावी लागली. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली, भारतीय संघानं 2024 च्या टी-20 विश्वचषकाच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेला हरवून दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावलं.

वेस्ट इंडिज संघानं एकेकाळी टी-20 स्वरुपात वर्चस्व गाजवलं होतं, 2012 मध्ये पहिल्यांदा टी-20 विश्वचषक जिंकला होता. त्यानंतर, त्यांना दुसऱ्यांदा विजेतेपद जिंकण्यासाठी जास्त वेळ वाट पाहावी लागली नाही. कोलकात्यातील ईडन गार्डन्स स्टेडियमवर झालेल्या 2016 च्या टी-20 विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात वेस्ट इंडिज संघानं इंग्लंडला हरवून दुसऱ्यांदा ट्रॉफी जिंकली.

इंग्लंड संघानंही आतापर्यंत दोनदा टी-20 विश्वचषक ट्रॉफी जिंकली आहे. 2010 मध्ये इंग्लंडनं टी-20 विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाला हरवून पहिल्यांदाच विजेतेपद जिंकलं. त्यानंतर 2022 च्या टी-20 विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात इंग्लंडनं मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर पाकिस्तानला हरवून दुसऱ्यांदा विजेतेपद जिंकलं.




### विजेते संघ आणि त्यांच्या कर्णधारांची यादी

- 2007: भारत; महेंद्रसिंग धोनी
- 2009: पाकिस्तान; युनूस खान
- 2010: इंग्लंड; पॉल कॉलिंगवुड
- 2012: वेस्ट इंडिज; डॅरेन सॅमी
- 2014: श्रीलंका; लसिथ मलिंगा
- 2016: वेस्ट इंडिज; डॅरेन सॅमी
- 2021: ऑस्ट्रेलिया; आरोन फिंच
- 2022: इंग्लंड; जोस बटलर
- 2024: भारत; रोहित शर्मा
- 2026: भारत; सूर्यकुमार यादव

### १२० कोटी रुपयांची बक्षीसं

**या टी-20 विश्वचषकातील विजेता आणि उपविजेता संघाव्यतिरिक्त इतर संघांना किती रक्कम दिली जाईल हे तुम्हाला माहिती असले पाहिजे. आयसीसीनं आधीच जाहीर केलं होतं की या वर्षीचा एकूण बक्षीस पूल 120 कोटी रुपयांचा असेल. याचा अर्थ असा की सर्व संघांना एकूण एवढी रक्कम मिळेल. म्हणजेच विजेता आणि उपविजेता संघाव्यतिरिक्त, चार उपांत्य फेरीतील संघ, सुपर-8 मध्ये पोहोचणारे आठ संघ आणि पहिल्या फेरीत बाहेर पडलेल्या संघांसाठी देखील बक्षीस निधी वाटप करण्यात आला आहे.**

### प्रशिक्षकाची भूमिका महत्त्वाची

**पूर्वी भारताच्या विजेत्या संघांची ओळख त्याच्या कर्णधारांवरून होत असे कपिल देवचा संघ, धोनीची सेना किंवा रोहित शर्माची टीम. मात्र या विश्वचषकानंतर चित्र बदलल्याचे दिसते. फुटबॉलप्रमाणेच क्रिकेटमध्येही प्रशिक्षकाचा प्रभाव वाढू लागला आहे, याचे हे संकेत आहेत. गंभीर हा संघाच्या रणनीतीपासून खेळाडूंच्या निवडीपर्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे दिसले. निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर याचा त्याला पूर्ण पाठिंबा होता. त्यामुळे संघात मोठी नावे असली तरी त्यांना आपण संघात राहणार का याची खात्री नव्हती.**

### पुण्यात तरुणाईचा जल्लोष





**टी -२० विश्वचषकात भारताने न्यूझीलंडवर एकतर्फी विजय मिळविल्यानंतर रविवारी शहरभर जल्लोष करण्यात आला. आतषबाजी, एकमेकांना पेढे भरवून पुणेकरांनी विजयाचा आनंद द्विगुणीत केला. डेक्कन जिमखाना, लष्कर, कोरेगाव पार्क भागात जल्लोष करण्यात आला. विश्वचषकातील अंतिम सामन्यात भारताने सुरुवातीपासून पकड ठेवली होती. शहरातील विविध सार्वजनिक मंडळांनी क्रीडाप्रेमींसाठी मोठ्या पडद्यावर अंतिम सामन्याचे थेट प्रक्षेपण केले. चौकाचौकात ध्वनीवर्धक लावण्यात आले होते. न्यूझीलंड विजय मिळवल्यानंतर तरुणाईने जल्लोष केला. चौकात ध्वनीवर्धकावर लावलेल्या गीतांवर नृत्य केले. तिरंगा फडकावून जल्लोष करण्यात आला. विजयाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी अनेक जण नामदार गोपाळ कृष्ण गोखले चौक (गुडलक चौक), जंगली महाराज रस्ता, लष्कर भागातील महात्मा गांधी रस्ता परिसरात जमले. तरुणांनी चौकात ध्वज फडकावून जल्लोष केला.शहरातील विविध उपाहारगृहात ग्राहकांसाठी अंतिम सामन्याचे प्रक्षेपण करण्यात आले. एरंडवणे, कोरेगाव पार्क, लष्कर भागातील उपाहारगृह परिसरात गर्दी झाली होती. रात्री शहरातील प्रमुख चौकात जल्लोष करण्यात आला. डेक्कन जिमखाना, लष्कर, कोरेगाव पार्कसह शहरातील वेगवेगळ्या भागात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. जल्लोषाला गालबोट लागू नये शहर, उपनगरातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली.**


# विजयी जल्लोषानंतर कुटुंबांसोबत भारतीय क्रिकेट








**• ८ मार्च, जागतिक महिला दिन, हा केवळ एक दिवस नसून महिलांच्या कर्तृत्वाचा आणि संघर्षाचा सन्मान करण्याचा सोहळा आहे. या निमित्ताने समाजातील अशा एका घटकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे गरजेचे आहे, ज्यांनी अतिशय प्रतिकुल परिस्थितीत घराघरात पोहोचून आरोग्याची धुरा सांभाळली त्या म्हणजे 'आरोग्य सेविका रोहीणीताई दगडू पिंगळे .!'**

# ग्रामीण आरोग्य सेविका : रोहीणी पिंगळे

महिला दिन विशेष

**किरण खुडे**

**(दै. आरंभ पर्व)**

१९९० सालच्या जवळपासचा कालखंड. ज्याकाळी अनेक खेडोपाड्यात एसटी बस सुद्धा पोहोचली नव्हती. गावोगावी पाण्याचं दुर्भिक्ष असायचं. मोलमजूरीवर माणसं कामावर जात होती. तरीही चरितार्थ चालविण्यापलीकडं फारसं काही मिळत नव्हतं. हिवाळ्याच्या मध्यावरच खेडोपाडी - वाड्यावस्त्यांवर दुष्काळाचं मळभ पसरायचं. मग उपासमार होण्यापेक्षा मिळेल त्या मजूरीवर काबाडकष्ट करणारा समाज जिथेतिथे दिसतं होता. अशा परिस्थितीत कुणी आजारी पडलं तर वैद्यकीय उपचार घ्यायलाही पैसे नसायचे. अशीच परिस्थिती ग्रामिण महाराष्ट्रातल्या अनेक दुर्गम भागात होती.

१९६७ साली जन्मलेल्या रोहीणीताईंचं माहेर शिरूर तालुक्यातील सविंदणे गाव.! एकत्र कुटुंबपद्धतीत त्यावेळी शेती हाच उत्पन्नाचा स्त्रोत. त्यांचे वडील संभाजी पडवळ हे काबाडकष्ट करणारे शेतकरी. बारावी पर्यंतचं शिक्षण झाल्यावर त्याकाळी लग्न उरकुन जबाबदारी पुर्ण करण्याकडे वडीलधाऱ्यांचा कल होता. त्याप्रमाणे घरात विषय सुरू झाला. परंतु शिक्षण पूर्ण करत असताना अनेक कर्तुत्ववान महिलांच्या कार्याचा प्रभाव रोहीणीताईंच्या अंतरंगात सामाजिक जाणिवेच्या पातळीवर व्यक्तीमत्वात उतरत होता. व त्यातूनच स्वावलंबी तर व्हायचचं, पण सामाजीक दातृत्व निभाऊन, हा मनाशी निश्चय केला. कुटुंबियांना त्यामागची भुमिका समजाऊन सांगितली. वडील पाठीशी उभे राहिले, आणि त्यातूनच थेट पुण्यात, आरोग्य सेविका या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला.

आरोग्य सेविकेचं शिक्षण घेत असताना समोर आदर्श होता तो भारतातल्या पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांचा. वैद्यकीय उपचाराअभावी होणारे नवजात बालकांचे मृत्यू हि त्यावेळची गंभीर समस्या निर्माण झाली होती. मोठ्या गावांमध्ये व शहरात उपचार घेणे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर होते. त्यातून त्याकाळी दुर्गम भागात वाड्या वस्त्यांवर शिक्षणाचा अभाव होता. अनेक गर्भवती महिलांची घरीच प्रसुती केली जात होती. पारंपारीक ज्ञान असलेल्या कुशल, अनुभवी सुईण महिला त्यावेळी हे काम करत. परंतु अनेक दुर्गम ठिकाणी जाऊन हे करण्यात त्यांनाही मर्यादा येत असत. अशा वेळी आरोग्य सेविका हा एक चांगला पर्याय समाजाला दिशा देणारा ठरला. १९८९ ला रोहीणीताईंची खेड तालुक्यातील गुळाणी गावचे व पेशाने शिक्षक असलेले दगडू पिंगळे यांच्याशी लग्नगाठ बांधली. गुरुजींच्या भक्कम पाठींब्यावर त्याच वर्षी त्या आरोग्य सेविका म्हणून तालुक्याच्या पश्चिम दुर्गम आदिवासी भागातील डेहणे गावात रुजू झाल्या.

"सेवा परमो धर्मः" असं मानून तुटपुंज्या मानधनावर केवळ समाधान म्हणून आदर्शवत काम करणाऱ्या रोहिणीताईंची त्याकाळी वेळेशीच स्पर्धा सुरू झाली. खेडोपाडी, दुर्गम डोंगराळ भागात, आदिवासी पाड्यांवर मैलोनमैल पायी फिरून गर्भवती महिलांची नोंदणी करणे, त्यांना लोहयुक्त गोळ्यांचे वाटप करणे, प्रसूतीसाठी रुग्णालयात नेण्याकरीता त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे समुपदेशन करणे, त्यांना रुग्णालयात नेणे, गरोदरपणापासून ते प्रसूतीनंतरच्या काळात आवश्यक सेवा, शुश्रूषा आणि बाळ-बाळंतिणीचे तेलपाणी करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी नि:स्वार्थीपणे केले. शिशु जन्मानंतर बालकांचे लसीकरण पूर्ण करणे यातून त्यांनी त्याकाळात मृत्यूदर कमी करण्यात मोलाचा वाटा उचलला.

त्यांच्या कार्याचा विस्तार जसा वाढत गेला. तशी कार्याची कक्षाही रुंदावत गेली. राजगुरूनगर या तालुक्याच्या गावाच्या २४ वाड्या, त्याजवळच्या वस्त्या आणि ठाकरवाड्या यांना आरोग्य सेविकांची निकडीची गरज जाणवू लागली. दिवसरात्र एक करून मोठ्या आनंदानं ही सेवा त्यांनी मन लाऊन केली. अनेकदा गंभीर रुग्न महिलांच्या मदतीसाठी व तातडीच्या पुढील उपचारासाठी रात्री - अपरात्रीही त्यांनी रुग्न पुण्याच्या रुग्नालयात दाखल करुन त्यांची सेवा केली. स्वतःचं कुटुंब, मुलंबाळं यांच संगोपन करतानाच त्यांनी कर्तव्याशीही निष्ठा कायम ठेवली. त्याच सेवेची पावती म्हणून त्यांच्या उल्लेखनिय कार्याबद्दल त्यांना २०१६ साली आरोग्य विभागाचा प्रतिष्ठेचा मानला जाणारा 'भारतातल्या पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी 'पुरस्कार हा सन्मान मिळाला. ज्यांना आदर्श माणून लोकसेवेचं काम हाती घेतलं, त्यांच्याच नावाने मिळालेला पुरस्कार त्यांचा आनंद द्विगुणीत करणारा ठरला.!!

पतीच्या पाठीशीही तेवढ्याच ताकदीने त्या उभ्या राहील्या. त्यांनीही खेडोपाडी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी घेतलेल्या मेहनतीचे फळ म्हणून त्यांनाही 'आदर्श शिक्षक' या राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या दापत्यांना असलेली अपत्ये अभियांत्रीकी क्षेत्रात तज्ञ आहेत.

असंच सर्व सेवाकार्य सुरू असताना रोहीणीताईंना २०१८ साली अचानक पक्षाघाताचा झटका आला. मोठं संकट उभं राहिलं. ज्यांनी अनेकांच्या दारोदारी हिंडून आरोग्यसेवा आरोग्यदुत होऊन दिली. त्याच्यांच पुढ्यात दैवानं आजारपण संकट म्हणून उभं केलं. प्रयत्न करूनही त्यांच्या प्रकृतीत फारशी सुधारणा होत नसल्याने नाईलाजास्तव त्यांनी ३० वर्षांच्या सेवेतून स्वेच्छानिवृत्ती स्विकारली.

स्वेच्छानिवृत्ती नंतरही त्या थांबल्या नाहीत. 'प्रवाही असतं तेच जीवन' असं मानूण सेवानिवृत्तीनंतरही त्या सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्या आजही किशोरवयीन मुलींना मासिक पाळी स्वच्छता, पोषण आणि आरोग्य विषयक मार्गदर्शन करतात. त्यांचं आयुष्य हे समाजसेवेचं प्रतीक मानलं जातं आहे. गर्भवती महिलांची काळजी घेणे, बालकांचे लसीकरण, कुपोषणाची तपासणी, प्रौढ आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे, स्तनपानाविषयी जनजागृती, कुटुंब नियोजन यासारख्या अनेक कार्यक्रमांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. त्यांनी अनेक महिला बचत गटांना आरोग्यविषयी प्रशिक्षण दिले आणि त्यांना स्वावलंबी बनवले आहे.



आजारणाने त्यांना फारसं बोलणं शक्य होत नाही. पणं जसं शक्य होईल तसं खुणेने सांगुन लिहून त्यांनी समाजाप्रती कार्य सुरूच ठेवलं आहे.त्यांच्या सेवेत एक विशेष बाब म्हणजे, त्यांनी केवळ आरोग्य विषयक उपचारच दिले नाहीत, तर लोकांच्या मनात आरोग्याविषयी जागरूकता निर्माण केली. त्यांनी गावोगावी जाऊन स्वच्छता अभियान, कुष्ठरोग, टी.बी., मलेरिया, डेंग्यू अशा आजारांविषयी माहिती दिली. त्या केवळ एक सेविका नाहीत, तर ग्रामिण भागात समाजसुधारक मानल्या जातात.

त्यांच्या कार्याची दखल विविध पातळ्यांवर घेण्यात आली आहे. त्यांना जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरवण्यात आले. आरोग्य विभागातील अधिकारी, सहकारी, गावकरी – सर्वच त्यांच्याविषयी अत्यंत आदराने बोलतात. त्यांचं मृदू बोलणं, सहकार्याची वृत्ती आणि वेळेचं भान ही त्यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्यं आहेत.

आपल्या ३० वर्षांच्या सेवा काळात त्यांना अनंत अडचणींना सामोरे जावे लागले अपुरा कर्मचारी वर्ग, मर्यादित साधनसामग्री, वाहतुकीची अडचण पण या सर्व अडथळ्यांवर त्यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून मात केली. आपल्या कामावर निष्ठा ठेवत त्यांनी कधीही तक्रार केली नाही. त्यांच्या कार्यामुळे अनेक कुटुंबांना आरोग्य लाभले आणि त्यांचे जीवनमान सुधारले.

रोहिणीताईंची यशोगाथा केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रगतीची नसून, त्यांनी बदललेल्या अनेक आयुष्यांची आहे. आरोग्य सेविकेच्या समर्पणामुळेच आज ग्रामीण भागातील स्त्रीला आपल्या आरोग्याविषयी बोलण्याचे धैर्य मिळत आहे. या महिला दिनी, समाजासाठी निस्वार्थपणे राबणाऱ्या 'रोहिणीताईंच्या कार्याला मानाचा मुजरा ..!



• • •






दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. ०९ मार्च २०२६









# रंगपंचमी व महिला दिनानिमित्त 'खडकवासला जलाशय रक्षण अभियानात' महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

## २४ वर्षांची परंपरा कायम; मोहीम यंदाही शंभर टक्के यशस्वी




**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

रंगपंचमी आणि आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी 'खडकवासला जलाशय रक्षण अभियानात' महिलांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हिंदू जनजागृती समितीच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाला यंदाही नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. रविवारी सुट्टीचा दिवस असूनही विविध भागांतून महिलांनी उपस्थित राहून जलाशय रक्षणासाठी सक्रिय सहभाग घेतला. रंगपंचमीच्या निमित्ताने जलाशयात रंग, कचरा किंवा इतर प्रदूषक पदार्थ टाकले जाऊ नयेत यासाठी नागरिकांचे प्रबोधन करण्यात आले. गेल्या २४ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणारे हे अभियान यंदाही शंभर टक्के यशस्वी झाल्याचे आयोजकांनी सांगितले.

या मोहिमेला शासन व प्रशासनाचेही सहकार्य लाभले. पोलीस, स्थानिक प्रशासन तसेच विविध विभागांनी आवश्यक ती मदत केली. पर्यावरणाबाबत जागरूक नागरिकांनीही स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत या अभियानाला बळ दिले. महिला दिनाच्या निमित्ताने महिलांनी पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेतल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

सकाळी भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून मोहिमेची सुरुवात करण्यात आली. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, सासवड, हडपसर, भोर तसेच आळंदेवाडी परिसरातून मोठ्या संख्येने नागरिक आणि हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते या मोहिमेत सहभागी झाले. अधिवक्ता, संगणक अभियंते, उद्योजक आणि पत्रकारांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

उपस्थित मान्यवरांनी समितीच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, "पाण्याची नासाडी आणि प्रदूषण रोखण्यासाठी कार्यकर्ते ज्या जिद्दीने जलाशय रक्षणाचे काम करतात ते प्रेरणादायी आहे. महाराष्ट्रातील नद्यांना प्रदूषणमुक्त करण्यासाठी अशी अभियाने लोकचळवळ बनणे गरजेचे आहे." मोहिमेच्या शेवटी समितीचे पराग गोखले यांनी सहभागी नागरिक आणि सहकार्य करणाऱ्या यंत्रणांचे आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे






### मुघलकालीन पाककलेपासून प्रेरित 'सुहाना नूर' मसाला श्रेणी सादर

पुणे (आरंभ पर्व) : भारतामधील वेगाने विकसित होत असलेल्या मसाले आणि फूड सोल्युशन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या प्रविण मसालेवाले यांनी आपल्या उत्पादन पोर्टफोलिओचा विस्तार करत 'सुहाना नूर' या नव्या मिश्र मसाल्यांच्या श्रेणीचे सादरीकरण केले आहे. मुघलकालीन स्वयंपाकघरांपासून प्रेरित असलेल्या या मसाल्यांच्या श्रेणीमुळे घरच्या घरी पारंपरिक मुघलाई पाककृतींचा अस्सल स्वाद अनुभवता येणार आहे. भारतीय पाककलेवर पर्शियन, पश्चिम आशियाई तसेच मुघलकालीन संस्कृतींचा प्रभाव असून मुघलाई पाककला आज भारतीय खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग बनली आहे. कोरमा, कबाब, टिक्का आणि बिर्याणी यांसारख्या पदार्थांच्या चवीमध्ये मसाल्यांच्या अचूक मिश्रणाची महत्त्वपूर्ण भूमिका असते. हीच परंपरा जपत सुहाना नूर श्रेणी विकसित करण्यात आली आहे.

### बारामतीत बजाज फायनान्सकडून जनजागृती कार्यक्रम



बारामती (आरंभ पर्व) : डिजिटल व्यवहार वाढत असताना सायबर फसवणुकीच्या घटनांमध्येही वाढ होत असल्याने नागरिकांनी सतर्क राहून इतरांनाही सावध करावे, असे आवाहन बारामती पोलिसांनी केले आहे. याच पार्श्वभूमीवर बजाज फायनान्स लिमिटेडच्या वतीने बारामती येथे 'नॉकआउट डिजिटल फ्रॉड' या सायबर फसवणूक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तुळजाराम चतुरचंद (टीसी) महाविद्यालयात आयोजित या कार्यक्रमात पीएसआय वर्षाराणी घाटे (पुणे ग्रामीण सायबर सुरक्षा), मानस शर्मा (डिजिटल फॉरेन्सिक आणि इन्सिडंट रिस्पॉन्स अनालिस्ट), निवृत्त एसीपी बाबर सर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान वक्त्यांनी बनावट ओटीपी, फिशिंग, डिजिटल अरेस्ट, कर्ज किंवा पेन्शनच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीच्या प्रकारांबाबत नागरिकांना माहिती दिली. वाढत्या डिजिटल व्यवहारांच्या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हेगारांकडून वापरल्या जाणाऱ्या नव्या पद्धतींबाबतही जागरूकता निर्माण करण्यात आली.

### आंबेगाव खुर्द येथे महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिर संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने देशसेवा फाउंडेशन व कशिश फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिर व सॅनिटरी नॅपकिन विषयी जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम पारखे कॉर्नर, आंबेगाव खुर्द, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या शिबिरामध्ये महिलांना आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले तसेच मासिक पाळी दरम्यान स्वच्छता राखण्याचे महत्त्व आणि सॅनिटरी नॅपकिनचा योग्य वापर याबाबत सविस्तर जनजागृती करण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांना मोफत सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला केतकी शिरबावीकर, डॉ. स्मिता बारवकर, प्रिया पाटील, पूर्वा पाटसकर, अमिता धोपाडे, निकिता चव्हाण, स्नेहल वाकसे, कशिश पवार, मेघना आठल्ये, ज्योती शर्मा तसेच पॅडमॅन योगेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच सौ. अस्मिता पारखे व ओंकार पारखे यांचीही विशेष उपस्थिती होती.

## 'स्वस्थ नारी साडी वॉकेथॉन २०२६' चे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महिलांचे कल्याण, उत्साह आणि उर्जेला साजरे करण्यासाठी आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल, चिंचवड तर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून 'स्वस्थ नारी साडी मॅरेथॉन २०२६' चे आयोजन करण्यात आले होते.चिं चवड येथील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल द्वारे सुरु करण्यात आलेल्या या वॉकेथॉन मध्ये पिंपरी चिंचवड इलाक्यातील विविध वयोगटांतील १५०-१७० महिलांनी भाग घेऊन वातावरण उत्साही केले. या उपक्रमाचे लक्ष्य म्हणजे महिलांनी सकारात्मक जीवनशैलीचा अवलंब करुन त्यांच्या प्रतिबंधात्मक आरोग्याला प्राधान्य देत नियमित आरोग्य तपासणी करावी आणि या मंचाच्या माध्यमातून समाजातील बंध साजरा करणे शक्य व्हावे. या उपक्रमाने महिलांना त्यांच्या कुटुंबाला प्राधान्य देण्याबरोबरच स्वतःच्या आरोग्या कडे लक्ष देणे तितकेच महत्त्वाचे असून त्यांनी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करुन स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. त्याच बरोबर सहभागी लोकांचा उत्साह आणि प्रतिसाद साजरा करण्याच्या हेतूने हॉस्पिटल तर्फे विशेष पुरस्कारही देण्यात आले.

## सिंहगडावर मधमाशांचा हल्ला; काही पर्यटक जखमी

**सिंहगड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ सिंहगड किल्ला येथे रविवारी दुपारी खाऊ गल्ली परिसरात पर्यटकांवर अचानक मधमाशांचा हल्ला झाल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत दोन वर्षांच्या एका बालकासह काही पर्यटकांना मधमाशांनी दंश केल्याची माहिती मिळाली आहे.



घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र वन विभाग तसेच संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गडावर जाणाऱ्या पर्यटकांना काही काळासाठी तात्पुरते थांबविण्यात आले. मधमाशांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या दोन वर्षांच्या बालकासह अन्य दोघांना उपचारासाठी संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे सुरक्षा रक्षक मंगेश गोफणे आणि तानाजी खाटपे यांनी तातडीने गडावरून खाली हलवले. तसेच आणखी काही पर्यटकांनाही मधमाशांचा उपद्रव झाल्याची माहिती समोर आली आहे.


दरम्यान, काही उदाम व उपद्रवी पर्यटकांनी गडावरील तटबंदीखाली दगड फेकण्याचा प्रकार केल्याने मधमाशांचा हा हल्ला झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पर्यटकांच्या अशा बेजबाबदार वर्तनामुळे इतर पर्यटकांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण होत असल्याची नाराजी स्थानिकांनी व्यक्त केली आहे. या घटनेनंतर वनविभाग आणि स्थानिक प्रशासनाने परिसरात आवश्यक खबरदारीचे उपाय सुरू केले असून पर्यटकांनी गडावर भेट देताना नियमांचे पालन करावे आणि कोणतीही धोकादायक कृत्ये करू नयेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आयुष्य व भविष्य घडवणारा ग्रंथ - निसर्ग दाता

**(दै. आरंभ पर्व)**

प्रसिद्ध स्तंभलेखक, पत्रकार व पोलीस पाटील विठ्ठल वळसे पाटील यांनी लिहिलेले पर्यावरण संदर्भातील ग्रंथ निसर्गदाता हे पुस्तक मानवी मनाला व जीवनाला त्यांचे मस्तक ताळ्यावर आणणारे आहे.

बालक, पालक, शिक्षक, पर्यावरण अभ्यासक यांच्यासह सर्व सजीव घटकांना समृद्ध करणारे वैचारिक मंथन महत्त्वाचे आहे. हे वैचारिक, भौगोलिक व शास्त्रीय दृष्ट्या पुस्तक खरोखर कसोटीला उतरले आहे. मानवी जीवनाचे आयुष्य वाढविणारे व भविष्य घडविणारे




संजीवन ठरणार आहे. पदोपदी जगताना औपचारिक कृत्रिमता पांघरून आपण जगत आहोत वरवरून

• समीक्षक •

भारत सातपुते

लातूर - 8087695000

नटण्यात आपण मशगुल असताना आपल्यातला ढोंगीपणा जागे करणारा हा ग्रंथ एक आरसा आहे. खऱ्या अर्थाने निसर्गाचा वारसा जपणारा हा ग्रंथ पर्यावरणाचा वाटाड्या आहे. निसर्ग, विज्ञान, भूगोल व अध्यात्म या सर्वांचा सुरेख असा संगम यात दिसून येतो. मानव, प्राणी, पक्षी, जल, जमीन, जंगल यांना श्वास व सुवास देणारे हे पुस्तक खरे तर शासनाने प्रत्येक ग्रंथालयात व अभ्यासक्रमात असायला हवे कारण यातील एकूण असलेले ४४ लेख हा पर्यावरणाचा अनमोल ठेवा आहे. यातील आशय भाषा मांडणी सोपी असून ती लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सहज समजण्यासारखे आहे. स्वराज्याचे सुराज्य करणारा हा स्वर्गमय निसर्ग दाता खऱ्या अर्थाने पर्यावरणाचा ग्रंथ आहे. स्वतः लेखक विठ्ठल वळसे पाटील यांनी बोलके मुखपृष्ठ तयार केले आहे. तर मातृरक्षा प्रकाशन पुणे यांचे प्रकाशन, पुणे विभागाचे प्रादेशिक वनसंरक्षक अशिषजी ठाकरे यांनी प्रास्तावनेतून या ग्रंथाला साज चढवला आहे.

## ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी डिजिटल शिक्षणाची नवी दारे खुली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडून त्यांचे डिजिटल कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने स्मायलिंग रॉक्स, न्यूयॉर्क या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संस्थापक झुलू घेवरिया यांच्या महत्त्वाकांक्षी डिजिटल ट्रेनिंग आणि रिसोर्स सेंटर (डीटीआरसी) प्रकल्पांतर्गत वाय फोर डी फाउंडेशन, पुणे यांच्या माध्यमातून कोल्हापूर जि.प.प्राथमिक शाळा आकुर्डे व जि.प. प्राथमिक शाळा वाघापूर येथे अत्याधुनिक संगणक कक्षाची उभारणी करण्यात आली आहे. या संगणक कक्षाचे उद्घाटन जि.प.सदस्या सौ.रोहिणीताई आबिटकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी अध्यक्षस्थानी आकुर्डे गावाचे सरपंच डॉ.रवींद्र पारकर,मुख्याध्यापक रवींद्र एकळ, जि.प.सदस्या सौ.अर्चना निकम, पंचायत समिती सदस्य एकनाथ जाधव, पंचायत समिती सदस्य विक्रम पाटील,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सागर पवार,शिक्षक, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## ग्रामपंचायत मोहरी बु., ता. भोर जि. पुणे

### जाहीर खुली बि - १ निविदा नोटीस

ग्रा. पं. मोहरी बु., ता. भोर, जि. पुणे यांचेकडून या जाहीर निविदा नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ग्रा.पं.मोहरी बु. येथे मा.लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत सुविधा पुरविणे (लेखाशिर्ष २५१५ -१२३८) अंतर्गत खालील प्रमाणे काम मंजुर असून सदर कामासाठी निविदा दि.०९.०३.२०२६ ते दि. १६.०३.२०२६ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रा.पं.कडे दाखल कराव्यात.

| अ. क्र. | कामाचे नाव | अं.प. रक्कम / साहीत्य रक्कम | निविदा रक्कम (जि.एस.टी.सहीत) | बयाना रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | मोहरी बु. येथे सामाजिक सभागृह बांधणे. | ५.०० लक्ष | ५९०/- | ५०००/- | ६ महीने |

अटी व शर्ती -

१) निविदा फॉर्म व कामाच्या तसेच साहीत्य बाबतच्या अटी व शर्तीची माहिती ग्रा.पं. मोहरी बु. कार्यालयात कार्यालयीन वेळेत मिळतील.
२) निविदा उघडण्याची प्रक्रिया दि. १७.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रा.पं.मोहरी बु. येथे पार पडेल.
३) निविदेसोबत नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, जि.एस.टी. प्रमाणपत्र झेरॉक्स व निविदा तसेच बयाणा रकमेचा डी.डी/धनादेश हा सरपंच ग्रा.पं.मोहरी बु. यांचे नावाने देय असावा त्याचप्रमाणे इतर आवश्यक कागदपत्रे स्वयं - साक्षांकित करून जोडावेत.
४) सर्व कामांच्या शासकीय नियमानुसार सर्व कपाती केल्या जातील.
५) कामाचे देयक काम पूर्ण झालेनंतर मोजमाप पुस्तिकेत नोंद होऊन काम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर देण्यात येईल.
६) कामावर तांत्रिक मार्गदर्शन उपअभियंता जि.प.उपविभाग भोर यांचे राहिल.
७) साहित्याचा दर्जा तपासून पुढील देयक अदा केले जाईल.
७) निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार ग्रा.पं.मोहरी बु. यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत मोहरी बु., ता. भोर जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत मोहरी बु., ता. भोर जि. पुणे


## टाटा पॉवर रिन्यूएबल्सकडून पुण्यात 'सस्टेनेबल स्केल' उपक्रमाचे अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नूतनक्षम ऊर्जा क्षेत्रातील आघाडीची कंपनी टाटा पॉवर रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड (TPREL) यांनी औद्योगिक ग्राहकांना सौर ऊर्जा आणि ऊर्जा साठवण उपायांचा लाभ मिळवून देण्यासाठी पुण्यात 'स्केल सस्टेनेबल विथ टाटा पॉवर' या ग्राहक संपर्क उपक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमातून औद्योगिक क्षेत्राला सौर ऊर्जा आणि बॅटरी ऊर्जा साठवण (BESS) उपायांचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यात आले. हा उपक्रम विशेषतः पोलाद, ऑटोमोबाईल, ऑटो घटक, डेटा सेंटर, अभियांत्रिकी आणि उत्पादन उद्योगांसाठी तयार करण्यात आला असून ऊर्जा खर्च बचत, शाश्वत कार्यपद्धतींचा अंगीकार आणि दीर्घकालीन नफा संरक्षण या बाबींवर भर देण्यात आला. कार्यक्रमात "महाराष्ट्राचा नूतनक्षम ऊर्जा महामार्ग" या विषयावर चर्चासत्र




आयोजित करण्यात आले. यात एमएसईटीसीएलचे मुख्य अभियंता पीयूष शर्मा, टाटा मोटर्सचे मुख्य शाश्वतता अधिकारी ज्योतिन कुट्टी सस्तभवन, पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल कुमार सैनी, सान्यो स्पेशल स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक दिलीपकुमार पाचपांडे आणि टाटा पॉवर-पश्चिमचे विद्याधर वागळे यांनी सहभाग घेतला. या उपक्रमाच्या माध्यमातून औद्योगिक ग्राहकांना ३ ते ५ वर्षांत गुंतवणुकीची परतफेड, सुधारित अंतर्गत परतावा दर (IRR), विजेच्या खर्चात बचत आणि दीर्घकालीन खर्च स्पर्धात्मकता मिळू शकते. तसेच ग्रीडवरील अवलंबित्व कमी करून शून्य कार्बन आणि ईएसजी (ESG) उद्दिष्टे पूर्ण करण्यास मदत होणार आहे. कंपनीच्या मते, सौर ऊर्जा प्रकल्पांचे आयुष्य २५ वर्षांहून अधिक असल्याने गुंतवणुकीची परतफेड झाल्यानंतरही उद्योगांना दीर्घकाळ आर्थिक बचत मिळू शकते.

आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या नवमाहीत टीपीआरईएलने महाराष्ट्रात १२६.३३ मेगावॅट रूफटॉप सौर क्षमता आणि १०० मेगावॅट ग्रुप कॅप्टिव्ह सौर प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र हे विकेंद्रीकृत स्वच्छ ऊर्जा स्वीकारणाऱ्या राज्यांपैकी एक प्रमुख बाजारपेठ बनले आहे.

राज्यात कंपनीने जामखेड येथे २०० मेगावॅटचा सौर प्रकल्प तसेच एनटीटी ग्लोबलसाठी १०० मेगावॅट ग्रुप कॅप्टिव्ह सौर प्रकल्प उभारले आहेत. या प्रकल्पांमुळे औद्योगिक क्षेत्रात हरित ऊर्जेचा वापर वाढण्यास मदत होत आहे. टाटा पॉवर रिन्यूएबल एनर्जी लिमिटेडने देशभरात नूतनक्षम ऊर्जा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विस्तार करत औद्योगिक ग्राहकांना ऊर्जा बचत, पर्यावरणपूरक उत्पादन आणि दीर्घकालीन शाश्वत विकास साध्य करण्यासाठी सक्षम करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘बीएनसीए’ मध्ये ‘कॉन्टेक्स्ट क्राप्ट’ कार्यशाळा संपन्न


- आधुनिक तंत्रज्ञान शिकण्यासाठी पुणे परिसरातील ५० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी

पुणे (आरंभ पर्व) : कॉंटेक्स्टक्राफ्ट – व्हर्टिकल मॉर्फोलॉजीज ही तीन दिवसांची पॅरामेट्रिक डिझाइन कार्यशाळा महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ.भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनच्या (बीएनसीए), पुणे येथील डिजिटल आर्किटेक्चर विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचा मुख्य विषय विविध शहरी संदर्भांमध्ये उंच इमारतींच्या (हाय-राइज) रचना विकासाचा होता. कार्यशाळेचा उद्देश सहभागी विद्यार्थ्यांना कम्प्युटेशनल डिझाइन थिंकिंगची ओळख करून देणे हा होता, ज्यायोगे ते संदर्भ, पर्यावरणीय घटक आणि कार्यक्षमतेवर आधारित परिमाणांचा विचार करून उभ्या स्वरूपातील वास्तुरचना विकसित करू शकतील. ही कार्यशाळा महाविद्यालयाचे प्राचार्य आर्किटेक्ट अनुराग कश्यप यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच डिजिटल आर्किटेक्चर विभागाच्या प्रमुख आर्किटेक्ट धनश्री सरदेशपांडे यांच्या सहकार्याने पार पडली.




### कृत्रिम बुद्धिमत्ता भारताच्या भविष्यास आकार देणार : संजय सेठ

पुणे (आरंभ पर्व) : पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (पीआयबीएम) येथे संस्थेचा १६ वा दीक्षांत समारंभ शनिवारी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला भारताचे केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर केंद्रीय जल शक्ती राज्यमंत्री राज भूषण चौधरी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला चॉईस एएमसीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी मनीष जैन, ग्रॅण्ट थॉर्नटन इंडिया एलएलपीचे भागीदार अंकित चुग, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, मुबिया इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक कवलदीप सिंग तसेच शॉपर्स स्टॉपचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी कवींद्र मिश्रा उपस्थित होते. पीआयबीएमचे अध्यक्ष रमणप्रीत यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी बोलताना संजय सेठ म्हणाले की, भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वाटचाल करत असून आजची तरुणाई हेच त्या विकसित भारताचे खरे ब्रँड ॲम्बेसेडर आहेत. भारतात ३० वर्षांखालील ६० कोटींहून अधिक तरुणांची लोकसंख्या असून ही देशाची मोठी ताकद आहे.







# महिला दिनानिमित्त ‘उजास’च्या महाराष्ट्रातील उत्पादन नेटवर्कचा विस्तार

- महिलांच्या नेतृत्वाखालील उपजीविकेच्या संधींना देणार बळकटी



पुणे (दै. आरंभ पर्व)

आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या अंतर्गत अद्वैतेशा बिर्ला यांनी स्थापन केलेल्या 'उजास' या संस्थेने महिलांच्या नेतृत्वाखालील उत्पादन नेटवर्कचा विस्तार केला आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियानाच्या सहकार्याने वर्धा येथे नवीन 'उजास ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग युनिट' सुरू करून हा विस्तार करण्यात आला आहे. महिला दिन जवळ येत असल्याचे औचित्य साधणारा हा उपक्रम स्केलेबल ग्रासरूट एंटरप्राइझ मॉडेल्सद्वारे महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला चालना देण्याच्या 'उजास'च्या कटिबद्धतेला बळकटी देणारा आहे.

ही भर पडल्यामुळे 'उजास' आता महाराष्ट्रात दोन 'उजास' ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स चालवत असून ती एकत्रितपणे ४५ स्वयंसेवा गटांतील महिलांना रोजगार पुरवत आहे. तसेच विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशातील सुमारे १,५०० अतिरिक्त महिलांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण करत आहे. जालना येथील पूर्वीच्या युनिटने दोन वर्षांत १,११,१२५ पुनर्वापरयोग्य कापडी पॅड तयार करून उत्कृष्ट फलनिष्पत्ती दाखवली आहे. तसेच स्थानिक आर्थिक सहभागाला शाश्वत चालना देणारा म्हणून समुदाय-चालित उत्पादनाला सुस्थापित केले आहे.

जालन्यातील युनिटने स्थानिक पातळीवर आणि संभाजीनगर, नांदेड, परभणी, बीड आणि बुलढाणा यांसारख्या शेजारच्या जिल्ह्यांमध्ये कापडी पॅडचे यशस्वीरित्या वितरण केले आहे. तसेच 'उजास' मेन्स्ट्रुअल हेल्थ एक्सप्रेस मोहिमेद्वारे महाराष्ट्र आणि संपूर्ण भारतात आपली व्याप्ती वाढविली आहे. या मोहिमेमुळे २५ राज्ये आणि १२१ शहरांमध्ये मोफत पॅडचे वितरण सुलभ झाले आहे. त्यामुळे जागरूकता, सुलभता आणि व्याप्ती लक्षणीयरीत्या वाढली आहे.

'उजास'च्या प्रमुख पूनम पाटकर म्हणाल्या, “'उजास' ग्रीन मॅन्युफॅक्चरिंग युनिटची रचना कटिंग आणि स्टिचिंगपासून ते गुणवत्ता नियंत्रण, पॅकेजिंग, मार्केटिंग आणि विक्री समन्वयापर्यंत पूर्णपणे महिलांच्या व्यवस्थापनाखाली असलेली उत्पादन परिसंस्था म्हणून करण्यात आली आहे. आमच्या जालना युनिटच्या कामगिरीकडे पाहता प्रत्येक सहभागी महिला कौशल्य आणि उत्पादनानुसार सुमारे ७५,००० रुपयांचे स्थिर वार्षिक उत्पन्न मिळवू शकते, त्यामुळे तिच्या कुटुंबासाठी अपेक्षित आर्थिक आधार मिळतो तर प्रत्येक बचत गटाला सामूहिकरीत्या शाश्वत उद्यमी उत्पन्नाचा फायदा होतो. उत्पादनाव्यतिरिक्त महिलांना आर्थिक साक्षरता, स्वच्छता मानके आणि व्यवसाय प्रक्रियांचे प्रशिक्षण दिले जाते, जेणेकरून त्या स्वतंत्रपणे युनिटचे व्यवस्थापन आणि विस्तार करू शकतील. हा केवळ रोजगार नाही - ही उपजीविकेची सुरचित मालकी असून ती आत्मविश्वास, कौशल्ये आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षितता निर्माण करते.”

या नवीन सुविधेतून दरवर्षी ५५,००० हून अधिक पुनर्वापरयोग्य कापडी पॅडचे उत्पादन होण्याचा अंदाज आहे. त्यातून महिलांच्या नेतृत्वाखालील उत्पादन केंद्रांचे 'उजास'च्या वाढणारे नेटवर्क आणखी मजबूत होईल. सक्रिय स्वयंसेवा गट परिसंस्था असलेले प्रदेश उद्योगनिर्मितीच्या जोडीने उत्पन्न निर्माण करणारे स्थानिक पातळीवरचे व्यवस्थापन असलेले उद्योग कसे उभारू शकतात आणि त्याच वेळेस आवश्यक आरोग्य गरजा पूर्ण करू शकतात, हे या उपक्रमातून दिसून येते.

## सोनालिकाची फेब्रुवारीमधील १२,८९० ट्रॅक्टरची आजवरची सर्वोधिक विक्री



- शेतकऱ्यांच्या विश्वासाच्या ३० वर्षांच्या पूर्तीचा आनंदोत्सव साजरा

पुणे (दै. आरंभ पर्व)

कृषी यांत्रिकीकरणाच्या राष्ट्र उभारणीच्या स्वतःच्या ऐतिहासिक ३० व्या वर्षात सोनालिका ट्रॅक्टरने आपल्या प्रवासात एका नवीन सोनेरी अध्यायाची भर घातली आहे. कंपनीने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये फेब्रुवारीमध्ये आतापर्यंतची सर्वाधिक १२,८९० ट्रॅक्टर विक्री नोंदविली आहे. ही नवीन ऐतिहासिक कामगिरी म्हणजे तिच्या व्यापक पातळीवरील दमदार कार्यान्वयनाची जोरदार पुष्टी असून 'जीतने का दम' (विजयाचा विश्वास) देण्याच्या सोनालिकाच्या मूळ विश्वासाचे मूर्त स्वरूप आहे. हा विश्वास म्हणजे शेतकऱ्यांना उज्वल भविष्याचे आश्वासन देणारे तिचे अंतर्भूत सामर्थ्य आहे. अचूकतायुक्त शेती आणि प्रगत कृषी-तंत्रज्ञान सर्व प्रदेशांमध्ये वाढत आहे. अशा वेळेस स्पर्धेमध्ये पुढे राहण्यासाठी सोनालिका उत्पादन नाविन्यपूर्णतेचा सखोल शेतकरी सहभाग आणि बाजारपेठेतील गतिमान संपर्क यांच्याशी संयोग घडवून आणत आहे. भारताचे कृषी क्षेत्र एका निर्णायक टप्प्यातून जात आहे. समर्थ धोरणात्मक पाठबळ, डिजिटल उपक्रमांद्वारे झपाट्याने यांत्रिकीकरण, कर्जाची सुलभ उपलब्धता तसेच शेती उत्पादकता आणि उत्पन्न वाढवण्याच्या उद्देशाने ग्रामीण पायाभूत सुविधांवर खर्च वाढला आहे. सोनालिकाने अलीकडेच लॉंच केलेल्या सोनालिका गोल्ड मालिकेसारखे भविष्यानुकूल ट्रॅक्टर विकसित करून जागतिक अभियांत्रिकी उत्कृष्टतेला सातत्याने चालना दिली आहे.

ते तळागाळातील शेतीच्या वास्तविकतेशी सुसंगत असून सोन्यासारखी भविष्यातील सुरक्षितता आणि शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन मूल्य निर्मितीची ते हमी देतात. शाश्वत शेतीसाठी यांत्रिकीकरण ही केवळ एक गरज नव्हे तर अधिक काही आहे, असे सोनालिकाचे मत आहे. भारतीय शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन विकासाचा भागीदार म्हणून आपली भूमिका अधिक मजबूत करण्यासाठी ती कायमच संलग्न, गतिमान आणि महत्त्वाकांक्षी आहे. या नवीन विक्रमी कामगिरीविषयी आपले विचार मांडताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, "खरा विजयाचा विश्वास ('जीतने का दम') नेहमीच अशा शेतकऱ्यांचा असतो जे त्यांच्या शेतात प्रगतीची लागवड करण्यासाठी दररोज उठतात. शेतकऱ्यांच्या महत्त्वाकांक्षा आणि जीवनात यशस्वी होण्याचा दृढनिश्चय वाढवणारे हेवी ड्युटी ट्रॅक्टर तयार करणे ही आमची जबाबदारी आहे, असे आम्ही मानतो.

## बुद्धिवादी म्हणून मिरवणाऱ्यांचा ‘सेक्युलर’शी संबंध नाही

**ज्येष्ठ विचारवंत प्रा. शेषराव मोरे यांचे परखड मत**



पुणे (दै. आरंभ पर्व)

‘देव मानत नाही, पूजा करत नाही या भूमिकेतून बुद्धिवादी म्हणवून घेत मिरवणाऱ्यांचा सेक्युलर असण्याशी काही संबंध नाही,’ असे परखड मत ज्येष्ठ विचारवंत प्रा. शेषराव मोरे यांनी रविवारी व्यक्त केले. ज्येष्ठ साहित्यिक वि. ग. कानिटकर जन्मशताब्दीपूर्तीनिमित्त राजहंस प्रकाशनच्या वतीने मंगला गोडबोले यांनी संपादित केलेल्या ‘अक्षरछाया’ या वि. ग. यांच्या वैविध्यपूर्ण साहित्यातील निवडक साहित्यावर आधारित पुस्तकाचे प्रकाशन प्रा. शेषराव मोरे यांच्या हस्ते झाले.

यानिमित्ताने मोरे यांचे ‘सेक्युलॅरिझम आणि भारत’ या विषयावर व्याख्यान झाले. त्या वेळी ते बोलत होते. कानिटकर यांच्या कन्या डॉ. अनुराधा भागवत आणि पुत्र डॉ. श्रीधर कानिटकर या वेळी उपस्थित होते.

# मुक्ताईनगरच्या लेकीची दिल्लीत भरारी

- मोहिनी जगताप ‘यूपीएससी’त देशात ३२३ वी!

मुक्ताईनगर-सागर नानोटे (दै. आरंभ पर्व)



जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत मुक्ताईनगरच्या कन्येने यशाचे उत्तुंग शिखर गाठले आहे. मुक्ताईनगर येथील मोहिनी अशोक जगताप हिने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC 2025) परीक्षेत देशात ३२३ वी रँक मिळवून आयएएस (IAS) पदाला गवसणी घातली आहे. अतिशय सामान्य परिस्थितीतून आलेल्या मोहिनीच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. मोहिनीचे वडील अशोक जगताप हे सेवानिवृत्त जिल्हा परिषद शिक्षक असून, आई कोकिळाबाई यांनी कुटुंबाला हातभार लावण्यासाठी अनेक वर्षे शिवणकाम केले. आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मोहिनीने जिल्हा परिषद शाळेपासून आपला प्रवास सुरू केला. २०१' मध्ये राहुरी कृषी विद्यापीठातून गोल्ड मेडल मिळवल्यानंतर तिने प्रशासकीय सेवेची जिद्द बाळगली. कोणत्याही महागड्या कोचिंग क्लासेसच्या झगमगाटात न अडकता, केवळ स्व-अभ्यास आणि चिकाटीच्या जोरावर तिने हे यश संपादन केले आहे.


विशेष म्हणजे मोहिनीने एकाच वेळी अनेक आघाड्यांवर यश मिळवले आहे . २५ फेब्रुवारी २०२६ रोजी लागलेल्या एमपीएससीच्या निकालात तिची 'कृषी अधिकारी' म्हणून निवड झाली, तर आता यूपीएससीतही तिने बाजी मारली आहे.

यासोबतच तिने केंद्रीय वन विभागाची परीक्षाही उत्तीर्ण केली आहे. महिला दिनाच्या दिवशी एका ग्रामीण भागातील मुलीने मिळवलेले हे यश तालुक्यातील इतर विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

या यशाबद्दल मुक्ताईनगर शहरात फटाके फोडून व पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला असून, सर्व स्तरातून मोहिनीवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# महिला दिनानिमित्त अधिकारी कर्मचारी मेळावा

राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)




राजगुरूनगर येथील राजगुरूनगर एसटी आगारातील महिला कर्मचाऱ्यांच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने महिलांच्या सन्मानासाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन आगारव्यवस्थापक विद्या कदम व उज्वला कुटे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी विविध चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सर्व कार्यक्रमात महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रमात सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मुक्त संवाद साधत त्यांच्या समस्या व प्रश्न जाणून घेतले. या संवादातून महिलांना योग्य मार्गदर्शन व प्रेरणा मिळाल्याची भावना सहभागी महिलांनी मनोगतातून व्यक्त केली. कर्मचारी महिलांच्या प्रतिसादामुळे कार्यक्रम यशस्वी आणि उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तबगार महिलांचा विशेष सत्कारही करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन श्रीमती वंदना बुरुड, स्नेहा कातोरे, रोहीणी साबळे, स्वाती बिराजदार, मनिषा सुतार, विजया बगाटे, रंजना बिराजदार, मनीषा मुळूक यांनी केले.

## भाजीपाल्याच्या दरात १०% वाढ

पुणे (दै. आरंभ पर्व)

उन्हाचा तडाखा वाढल्याने पुणे विभागातील काही भागांत पाणीटंचाई जाणवू लागली आहे. त्याचा परिणाम फळभाज्यांच्या उत्पादनावर होत असून, रविवारी मार्केट यार्डातील तरकारी विभागात फळभाज्यांची आवक रोडावल्याचे चित्र दिसून आले. रविवारी बाजारात सुमारे 85 ते 90 ट्रक मधून शेतमालाची आवक झाली. मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी राहिल्याने सर्वच फळभाज्यांच्या भावात सुमारे दहा टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती आडतदार निखिल भुजबळ यांनी दिली. परराज्यांतून झालेल्या आवकमध्ये कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश येथून हिरवी मिरची सुमारे 10 ते 12 टेम्पो, कर्नाटक येथून कोबी 2 ते 3 टेम्पो, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडू येथून शेवगा 4 ते 5 टेम्पो, राजस्थान येथून गाजर सुमारे 2 ते 4 टेम्पो, मध्य प्रदेश आणि राजस्थान येथून मटार 2 ते 3 टेम्पो, कर्नाटक येथून घेवडा 2 ते 3 टेम्पो, कर्नाटक आणि गुजरात येथून भुईमुग प्रत्येकी 2 टेम्पो, कर्नाटक येथून पावटा 2 टेम्पो, तमिळनाडू येथून तोतापुरी कैरी 1 टेम्पो, मध्यप्रदेश येथून लसणाची सुमारे 8 ते 10 टेम्पो तर इंदौर, आग्रा आणि स्थानिक भागातून मिळून बटाट्याची 25 ते 30 टेम्पो इतकी आवक झाली.

## भोर पंचायत समिती सभापती निवडीकडे सर्वांचे लक्ष

भोर (दै. आरंभ पर्व)

भोर पंचायत समितीच्या सभापती, उपसभापतिपदाची निवड सोमवारी (दि. 9) सकाळी 11 वाजता होणार आहे. तब्बल 9 वर्षांनंतर झालेल्या निवडणुकीत मतदारांनी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रत्येकी चार सदस्य विजयी केल्याने दोन्ही पक्षांचे समान संख्याबळ झाले आहे. परिणामी सभापती, उपसभापती कोणाचा होणार? याकडे संपूर्ण भोर तालुक्याचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे. आमदार शंकर मांडेकर आणि माजी आमदार संग्राम थोपटे यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे. भोर पंचायत समितीच्या सभागृहात सोमवारी सकाळी 11 ते 11.30 पर्यंत सभापती व उपसभापतिपदासाठी उमेदवारी अर्ज स्वीकारून सकाळी 11.31 ते 12 वाजेपर्यंत अर्जांची छाननी होऊन दुपारी 12.01 ते 12.30 उमेदवारी अर्ज मागे घेणे, नंतर दुपारी 12.31 पासून आवश्यक असल्यास मतदान घेईन निकाल जाहीर करण्यात येणार आहे. प्रांताधिकारी डॉ. विकास खरात हे पीठासीन अधिकारी असणार आहेत. सभापतिपदाच्या निवडणुकीत दोन्ही उमेदवारांना समान मते पडल्यास ईश्वरचिठ्ठीद्वारे सभापती निवडला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे सभापतिपद कोणत्या पक्षाच्या पारड्यात पडणार, समान मतदान झाल्यावर कोणाची चिठ्ठी निघणार की काही वेगळी खेळी होते.

# मालिकेच्या सेटवर महिला दिन उत्साहात साजरा

उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)



आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त स्टार प्रवाहवरील लोकप्रिय मालिका ‘मी सावित्रीबाई जोतीराव फुले’च्या सेटवर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी मालिकेचे निर्माते डॉ. अमोल कोल्हे यांनी मालिकेत काम करणाऱ्या सर्व महिला कलाकार, तंत्रज्ञ तसेच सपोर्ट स्टाफचा सन्मान करून त्यांच्या योगदानाचे कौतुक केले.

समाजसुधारक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणादायी जीवनावर आधारित ही मालिका महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश देत आहे. भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणासाठी आणि स्त्रीसमानतेसाठी केलेले कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे ठरत आहे. महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महिला कलाकारांबरोबरच कॅमेरा, मेकअप, वेशभूषा, निर्मिती विभाग आणि इतर तांत्रिक विभागांमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या मेहनतीचीही दखल घेण्यात आली. त्यांचा सत्कार करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना निर्माते डॉ. अमोल कोल्हे म्हणाले, “सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या स्त्रीशिक्षण आणि स्त्रीसक्षमीकरणाच्या विचारांचा आजही समाजावर मोठा प्रभाव आहे. ‘मी सावित्रीबाई जोतीराव फुले’ ही मालिका त्या विचारांना नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे काम करत आहे. महिला दिनानिमित्त सेटवर काम करणाऱ्या सर्व महिलांचा सन्मान करणे आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.”

या विशेष उपक्रमामुळे सेटवरील महिलांना प्रोत्साहन मिळाले असून सावित्रीबाई फुले यांच्या कार्याला अभिवादन करत आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.